# महात्मा गांधींच्या पुण्यतिथी निमित्त स्तब्धता पाळून हुतात्म्यांना अभिवादन



महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथी निमित्त प्रतिमा पूजन करताना डॉ.बी.एन.रावण,सोबत शिवाजीराव पाटील, डॉ. विजयकुमार पाटील, डॉ. एस. एस. कुरलीकर, डॉ. एम. के .कांबळे, प्रा.डी.एच.नाईक व मान्यवर

श्रीपतराव चौगुले आर्ट्स अॅण्ड सायन्स कॉलेज,माळवाडी-कोतोली अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राणार्पण केलेल्या हुतात्म्यांच्या स्मरणार्थ आदर व्यक्त करण्यासाठी सकाळी अकरा वाजता दोन मिनिटे मौन (स्तब्धता) पाळून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

यावेळी महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक प्रोफेसर डॉ.बी.एन. रावण यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.विजयकुमार पाटील होते.

कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून संस्था सचिव शिवाजीराव पाटील, ॲक्टिव्हिटी प्रमुख डॉ.एस.एस. कुरलीकर होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. एम.के.कांबळे यांनी केले आभार प्रा.डी.एच.नाईक यांनी मानले.